RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक २९] **बुधवार, एप्रिल २०, २०२२/चैत्र ३०, शके १९४४** **[पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००**

असाधारण क्रमांक ५०

प्राधिकृत प्रकाशन

रत्नागिरी नगर परिषद, रत्नागिरी

क्रमांक रनप/नगररचना/४६/२२७/सन २०२२-२३

सूचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये.

ज्याअर्थी, रत्नागिरी शहराचा सुधारित विकास आराखडा महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस १८९९/१३ सी.आर.क्र.१८६/अे/९९ युडी-१२, दिनांक २७ एप्रिल २००० ने भागशः मंजूर केला असून तो दिनांक २१ जून २००० पासून अंमलात आला आहे. ज्यामध्ये मौजे झाडगांव स.नं.२४७अ, हि.नं.६/२(पै) नगर भूमापन क्रमांक २६५५ मधून २० फूट (६.१०मी.) रुंदीचा रस्ता नियोजिला आहे ;

आणि ज्याअर्थी, सुधारित विकास आराखड्याचा उर्वरित भाग (इ.पी.३१ वगळता) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग निर्णय क्रमांक टीपीएस/१८०१/४४१/सी.आर.क्र.३५/०२/ युडी -१२, दिनांक १७ जून २००५ अन्वये मंजूर केला असून तो २७ जून २००५ पासून अंमलात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, २० फुट (६.१० मी) रुंदीच्या रस्त्याने बाधीत होणाऱ्या जमिनीच्या मालकांनी सदरच्या रस्त्याची आखणीमध्ये बदल करावा अशी मागणी केली आहे ;

आणि ज्याअर्थी रत्नागिरी नगर परिषदने प्रस्तूत २० फूट (६.१० मी) रुंदीचा रस्ता पूर्वेकडील हद्दीला लागून सरकविणे बाबतचा किरकोळ बदल रत्नागिरी शहराचा सुधारित मंजूर विकास आराखड्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये करणेची कार्यवाही हाती घेणेस सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १२१, दिनांक २० ऑक्टोबर २०२१ अन्वये मंजुरी दिली आहे. प्रस्तूत फेरबदल नकाशामध्ये निळ्या रंगाने दर्शविणेत आला आहे.

त्याअर्थी, असे कळविण्यात येते की, ज्यांना या किरकोळ बदलाबाबत आपल्या सूचना अगर हरकती द्यावयाच्या असतील त्यांनी त्या सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे मुदतीत लेखी स्वरुपात रत्नागिरी परिषदेच्या कार्यालयात सादर कराव्यात म्हणजे त्याचा विचार प्रस्तुत प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीकरिता सादर करण्यापूर्वी करणेत येईल.

नियोजित किरकोळ बदल दर्शविणारा नकाशा नगर परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून ठेवणेत आला आहे.

श्री. तुषार अरुण बाबर,
प्रशासक,
नगर परिषद, रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक १२ एप्रिल २०२२.

RATNAGIRI MUNICIPAL COUNCIL

क्रमांक रनप/नगररचना/४६/२२७/सन २०२२-२३

NOTICE

NOTICE UNDER SECTION 37 (*1*) OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANING ACT, 1966.

Whereas, the revised development plan of Ratnagiri Town has been partly sanctioned by Government of Maharashtra, Urban development Department *vide* Government Resolution No.TPS/1899/13 CR-186/A/99 UD-12, dated 27th April 2000 which came into force with effect from 21st June 2000 in this development plan a 20 feet wide road is proposed through S. N.247, H. No. 6/2 (pt) of Mouje Zadgaon C.T.S No. 2655 (pt) ;

And whereas, the remaining portion (except E.P. No. 31) of revised Development plan of Ratnagiri Town has been sanctioned by the Government of Maharashtra Urban Development Department *vide* Notification No. TPS 1801/441/CR-35/02/UD-12, dated 17th June 2005 which came into force with effect from 27th June 2005 ;

And whereas, the owner of the land whose land is affected by 20 feet (6.10 mt.) wide road. Is demanded to shift the alignment to the boundary of the said H. No.

Whereas, the Municipal Council, Ratnagiri has decided *vide* its resolution No. 121 dated 20th October 2021 to road shifting to east side road from 20 feet (6.10 mt.) by effecting minor modification in sanctioned development plan under section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planing Act, 1966 proposed modification is shown in blue colour on map.

Therefore, it is hereby inform that those who want to give their suggestion or objection to the said proposed modification may submit the same in office of Municipal Council, Ratnagiri in writing within period of one month from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*, so as to consider the same before submitting final proposal of modification to Government for sanction.

A map showing proposed minor modification has been kept in office of Ratnagiri Municipal Council during office hours for inspection by public.

SHRI TUSHAR ARUN BABAR,
Administrator,
Ratnagiri Municipal Council.

Ratnagiri,
dated 12th April 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.